ISSN 2231-4059 (PRINT)
UGC Care Group -1 Journal

# भाषा आणि जीवन

(विशेषांक)

वर्ष — ३९ संख्या — ०४
ऑक्टोबर — डिसेंबर २०२१



# अनुक्रमणिका


| क्र | | | |
|---|---|---|---|
| 1 | ऐतिहासिक स्त्रोतांचा शोध : एक मूल्यमापन | डॉ. कैलास फुलमाळी | 01 |
| 2 | माहीती आणि ज्ञान | चंद्रकांत प्रल्हाद सोनवने | 05 |
| 3 | भारतीय न्यायप्रणालीत लोक अदालतींचे महत्व | चंद्रमणी काशीनाथ भोवते<br>डॉ. अनिल सि. बनकर | 10 |
| 4 | अपार्थिवाचे चांदणे : आस्वादक समीक्षेचे मार्गदर्शक डॉ. द. भि. कुलकर्णी | प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 18 |
| 5 | ज्ञान प्राप्तीचे एक साधन म्हणून न्याय दर्शनातील प्रत्यक्ष प्रमाण : एक संक्षिप्त विवेचन | डॉ. अतुल महाजन | 23 |
| 6. | बौद्धांचे तत्वज्ञान | प्रा. डॉ.भुसारे एस. आर. | 28 |
| 7. | मानव्यविद्याशाखा अंतर्गत ज्ञान प्राप्तीचे स्त्रोत-एक अध्ययन | डॉ. दिपक जी. अराजपुरे | 32 |
| 8. | ऐतिहासिक संशोधनात कागदपत्रांची निवड (साधन सामुग्रीची निवड) | प्रा.डॉ.महेंद्र वि.गायकवाड<br>डॉ.मधूकरराव वासनिक | 36 |
| 9. | भारतीय तत्वज्ञातातील वस्तुनिष्ठ ज्ञानाचे साधन : ऐंद्रिय अनुभव की गूढ अंत–दृष्टी ? | डॉ. मनोज उत्तमराव पाटील | 42 |
| 10. | भारतीय ज्ञानमिमांसेच्या अनुशंगाने ज्ञानाचे स्त्रोत या शब्दाचे विश्लेषण | डॉ. मोनालिसा अ. खानोरकर | 46 |
| 11. | बोधातून प्राप्त ज्ञान : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. संतोश पंढरीनाथ मेंढेकर | 51 |
| 12. | न्याय दर्शनातील यथार्थ ज्ञान साधनांचे स्वरुप आणि महत्व | प्रा. डॉ. सीमा देशपांडे | 56 |
| 13. | मध्यकालीन महाराष्ट्रीय संतांच्या कार्याचा मागोवा | डॉ. श्रीकांत डी. पानघाटे | 60 |
| 14. | आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह: अर्थ, व्याप्ती, तत्वज्ञान आणि स्त्रोत साधने | डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर | 67 |
| 15. | ज्ञान : संकल्पना आणि ज्ञानाचे विविध स्त्रोत | डॉ. बाळासाहेब मुळीक | 75 |
| 16. | कोरोना काळातील आरोग्य विषयक जागरूकता - एक चिकीत्सा | डॉ. किर्ती आ. वर्मा | 80 |



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

T.C.

Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(M.S.)

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 17. | समाजशस्त्रातील ज्ञानार्जनाचे स्त्रोत : एक चिकीत्सा | डॉ. ओमप्रकाश आष्टनकर | 85 |
| 18. | विदर्भ राज्याची मागणी व जनतेची भूमिका | डॉ. रायन ज्यं. महाजन<br>डॉ. संदीप तुंडूरवार<br>डॉ. शरद सांबारे | 89 |
| 19. | भारतीय तत्त्वज्ञानातील ज्ञानाचे स्त्रोत | प्रा.डॉ.शिंडगे विजय सोपानराव | 94 |
| 20. | न्यायदर्शनातील अनुमान प्रमाण-स्वरुप व प्रकार | प्रा.सौ.जयश्री तांबे | 100 |
| 21. | ज्ञानाच्या स्त्रोतात जैन दर्शनातील अनुमान प्रमाणाचे महतवपूर्ण योगदान | प्रा. वर्षा जपे | 103 |
| 22. | वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावरील पर्यावरणविषयक उपक्रमाचा अभ्यास | डॉ.महादेव विष्णू मत<br>श्रीमती शिवकन्या निवृत्तीराव कदेरकर | 108 |
| 23. | समाजसुधारक संतश्री गाडगे महाराज | प्रा. योगेश मारोती करवाडे | 112 |
| 24. | संगीत उपासनेचा मानवी जीवनावर होणारा सकारत्मक परिणाम | प्रा. वैखरी वझलवार | 118 |
| 25. | 'भारतीय दर्शनातील शब्द प्रमाण' | डॉ. नरेंद्र वसंतराव रघटाटे | 121 |
| 26. | ज्ञानशास्त्र.. एक आव्हान | प्रा.रजनी आनंदराव काळे | 128 |



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

T.C

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# बौद्धांचे तत्वज्ञान

प्रा. डॉ. भुसारे एस. आर.
तत्वज्ञान विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**गोषवारा** :- भारतीय तत्त्वज्ञानाची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणून ज्ञान शास्त्राचा अभ्यास केला जातो. जगाच्या पाठीवर ज्या इतर अनेक ज्ञानशाखा आहेत त्यांचे मूळ हे ज्ञान शास्त्र होय. करण विश्वाच्या ज्ञानाशिवाय मानवी विकास नाही. या विश्वामध्ये जिकडे बघावे तिकडे ज्ञान भरलेले आहे. ते ज्ञान संपादन करत करतच मानवाने आपला विकास साधला. या विश्वामध्ये मानव प्राणी हा जिज्ञासू प्राणी आहे त्यामुळे त्याने आपल्या सभोवार पसरलेल्या या विश्वाच्या पसाऱ्यात चे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. ज्ञान ही एक अशी गोष्ट आहे की जी मानवाची जिज्ञासा सतत वाढवत रहात आली आहे. जगाच्या पाठीवर जेवढ्या मानवी संस्कृती, सभ्यता निर्माण झाल्या त्यांनी आपले एक ज्ञानशास्त्र विकसित केल्याचे दिसून येते. या विश्वाच्या पसाऱ्यात संबंधी असंख्य प्रकारचे प्रश्न मानवाला पडतात. त्याची उत्तरे शोधताना त्याला ज्ञानाची प्राप्ती होते. याच संदर्भात प्रस्तुत शोधनिबंधात सविस्तर चिकित्सा केली जाणार आहे.

**संज्ञा** :- तत्त्वज्ञानाचा अभ्यास करत असताना तत्त्वज्ञानातील ज्ञानशास्त्र हा विषयाचा गाभा आहे. यच्चयावत सृष्टी संबंधी विचार करत असताना मानवाने जी प्रगती केलेली आहे ती ज्ञानाच्या आधाराने होय. मानवाला या सभोवतालच्या सृष्टी संदर्भात ज्ञान मिळविण्याचे सतत उत्सुकता राहिली आहे. त्या अनुषंगाने ज्ञानशास्त्र ही तत्त्वज्ञानाची महत्त्वपूर्ण शाखा मानवी जीवनात अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मानवी जीवनात त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी अस्तित्व आणि विश्व निर्मिती संबंधी मानवाला कायम जिज्ञासा राहिली आहे. ज्ञानशास्त्र म्हणजे मानवाला जे ज्ञान होते त्याची सत्यता- असत्यता, त्याचा उगम, विकास, मर्यादा, खरे-खोटेपणा आणि इतर अनेक प्रश्नांसंबंधी चर्चा करता येते. भारतीय तत्त्वज्ञानत सर्वच दर्शनानी ज्ञानशास्त्रा संबंधी सविस्तर विचार केल्याचे दिसून येते.

**प्रस्तावना** :- ज्ञानसिद्धांताचा विचार करत असताना आपल्या मनामध्ये असंख्य प्रश्न पडतात. हे विश्व कुठून आले? याचा निर्माता कोण? ज्ञानाची सत्यासत्यता पडताळून पाहावी? ज्ञान संकल्पना कशी पडताळून पाहावी? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे ज्ञानशास्त्राच्या माध्यमातून तपासून पाहता येतात. भारतीय दर्शन पैकी बौद्ध दर्शनाच्या ज्ञानसिद्धांताची सविस्तर चर्चा या शोधनिबंधात करण्यात येणार आहे.

महात्मा गौतम बुद्धांनी आपल्या जीवनात अनेक प्रकारचे प्रसंग पाहिले. त्या माध्यमातून त्यांना जे ज्ञान झाले ते अखिल मानवजातीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असे ज्ञान होते. स्वतः गौतम बुद्धांनी कुठले ही ज्ञान कुणाच्या सांगण्यावरून स्वीकारलेले दिसून येत नाही. त्यांनी आपल्या जीवनात कठोर तपश्चर्या केली, उपासतापास केले, शरीर क्लेश केले पण त्यांना मानवी जीवनाचं सत्य उलगडलं नाही. बोधीवृक्षाखाली त्यांना ज्ञान प्राप्त झाले. मानवी जीवनाचे अंतिम सत्य त्यांच्या समोर आलं. हे सर्व त्यांनी प्रत्येक्षाच्या माध्यमातूनच स्वीकारलं. जीवनात दुःख आहे, दुःखाला कारण आहे, दुःखाचा उपशम करता येतो. दुःख उपशमाचे मार्ग ही चार आर्यसत्य त्यांच्या हाती लागली. पण एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की हे सर्व त्यांनी आंधळेपणाने स्वीकारले नाही. त्यांचा जास्त भर होता तो प्रत्यक्षाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या ज्ञानावर होय. त्याची सविस्तर चर्चा या शोधनिबंधात करण्यात येणार आहे. बौद्धांच्या ज्ञानशास्त्राचा अभ्यास या ठिकाणी केला जाणार आहे. महात्मा गौतम बुद्धांना ज्या प्रकारचे ज्ञान या विश्वाच्या संदर्भात झाले त्याचा लेखाजोखा याठिकाणी घेतला जाणार आहे.

**उद्देश** :- १) बौद्धांच्या तत्वज्ञानाचा प्रसार प्रचार करणे.
२) बुद्धांचे तत्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे.
३) बुद्धांच्या तत्वज्ञानातील वेगळेपणा लोकांसमोर मांडणे.
४) मध्यम मार्गी बुद्ध तत्वज्ञान जीवनासाठी कसे उपयुक्त आहे ते लोकांच्या लक्षात आणून देणे.
५) बुद्ध तत्वज्ञानाच्या माध्यमातून जीवनातील क्षणिकता हे अंतिम सत्य लोकांच्या समोर आणणे.

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

**विषय विश्लेषण** :- बौद्ध ज्ञानमीमांसा साधारणपणे बुद्धांच्या नंतर अस्तित्वात आली महात्मा गौतम बुद्धाने आपली ज्ञानमीमांसा चार आर्य सत त्यांच्या माध्यमातून सांगितली असे म्हणता येईल त्याला अनुसरून त्यांनी आपले प्रतित्यसमुत्पाद आर्य अष्टांग मार्ग अनात्मवाद आणि ते बुद्ध इत्यादी विषयांसंबंधी देखील उपदेश केलेला आहे. या सर्वांचा विचार करता असे दिसून येते की बुद्धांचे तत्त्वज्ञान हे प्रत्यक्ष आणि अनुमान या दोन प्रमाणावर अवलंबून असल्याचे दिसून येते वरील प्रमाण विषयी मात्र बुद्धांनी कधीही कुठेही उल्लेख केल्याचे दिसून येत नाही बुद्धांच्या प्रमाण विषयक विचारा संबंधी सांगताना नीलिमा सिन्हा आपल्या "भारतीय ज्ञानमीमांसा" या पुस्तकात लिहितात "बौध्द ज्ञनमीमांसा प्रणालीबध्द और वैज्ञानिक रूप मे पहली बार आचार्य दिग्नाग के ग्रंथों में सामने आती है। जिसका काल पांचवी-छठी शताब्दी समझाया जाता है। आज जिस बौद्ध ज्ञानमीमांसा का अध्ययन हम करते हैं उसकी आधारभूमि के रूप में दिग्नाग का प्रमाणसमुच्चय तथा धर्मकीर्ति के प्रमाण वर्तिक तथा न्याय बिंदु जैसे ग्रंथ है।"१ याचाच अर्थ असा की बौद्धांच्या ज्ञानमीमांसेचा विकास हा बुद्ध काळात झाला नसून. तो बुद्धांच्या नंतरच्या काळात झाला आहे असे दिसून येते. एकूणच भारतीय विचार केला करताना प्रत्येक दर्शनाची ज्ञानमीमांसा म्हणजे तरी काय? तर ज्ञान म्हणजे काय? यथार्थज्ञान कशाला म्हणतात? ज्ञानाची प्रमाणे कोणती? ज्ञानाचे प्रामाण्य काय? या आणि इतर प्रमुख प्रश्नांची चर्चा येतेच. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये बौध्दांच्या ज्ञानमीमांसेच्या अनुषंगाने वरील प्रश्नांची चर्चा करण्यात येणार आहे.

ज्ञान म्हणजे काय? या प्रश्नाच्या संबंधी चर्चा करत असताना त्याबद्दल बौद्धांची अनेक मते आहेत त्यापैकी योगाचार विज्ञानवादाच्या मतानुसार ज्ञाता ज्ञेय वस्तू आणि ज्ञान यात काहीही मूलभूत फरक नाही. ज्ञाता हे विशुद्ध विज्ञान होय असे त्यांचे मत होते.

तसेच वस्तू म्हणजे बाह्य वस्तूचे ज्ञान होणे होय. या संदर्भात विचार मांडताना डॉ. वेदप्रकाश डोणगावकर लिहितात, "एकंदर शून्यवादानुसार विज्ञान हे अंतिम सत्य नाही. त्याच्या दृष्टीने आपल्याला होणारे व्यवहारिक ज्ञान हे आभासरुपी आहे. म्हणजेच शून्यवादी व्यवहारिक ज्ञानाचे अस्तित्व स्वीकारतात. पण अशा ज्ञानाला ते व्यवहारिक जगतापुरतेच मर्यादित मानतात."

बौद्धांचा ज्ञानसिद्धांत सविस्तरपणे मांडला आहे तो म्हणजे योगाचार किंवा विज्ञानवाद या संप्रदायाने होय. योगाचारवादयांच्या मते ज्ञानास आकार देणारे बाह्य पदार्थ असतच नाहीत. केवळ विज्ञानंच अस्तित्वात असते. क्षणजीवी विज्ञानाचा अनंत प्रवाह प्रवाह म्हणजे हे विश्व होय. या ठिकाणी विज्ञान म्हणजे काय? असा प्रश्न निर्माण होतो. विज्ञानालाच ते संकल्पना म्हणून मान्यता देत असताना दिसून येतात. प्रत्येक संकल्पना ही स्वयंप्रकाशित असते. ती ज्ञात्याशिवाय अस्तित्वात असते. तिच्या अस्तित्वासाठी ज्ञाता असण्याची गरज नाही. असे बौद्ध दर्शनकार योगाचार मानतात. बाह्यपदार्थांना अस्तित्व नाही असे सांगण्यासाठी त्यांनी काही युक्तिवाद करतात. ते युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहेत. ज्ञानाशिवाय ज्ञानाचा विषय आपणास कधीही उपलब्ध होत नाही. जेव्हा एखादी गोष्ट अस्तित्वात आहे असे आपण म्हणतो तेव्हा त्याचे ज्ञान ही उपलब्ध असते. ज्ञान हे ज्ञानाच्या आकाराचेच असते असे म्हणणे आहे. ज्ञान आणि ज्ञानाचा विषय हे दोन नसून एकच आहेत. आणि त्यालाच योगाचारी विज्ञान असे म्हणतात. बाह्यपदार्थ नाकारून विज्ञानाचे अस्तित्व मान्य केले आहे.

स्वप्नामध्ये बाह्यपदार्थ उपस्थित नसताना देखील त्याचे ज्ञान होते. मग जागृत अवस्थेत असे ज्ञान होण्यास काय हरकत आहे? असा प्रश्न उपस्थित करून योगाचार मतवादी बाह्य पदार्थाचे अस्तित्व नाकारून केवळ विज्ञान Ideas किंवा संकल्पना आहेत असे म्हणतात.

'मी आहे' अशी जाणीव होते पण या जाणीवेचा विषय बाह्य घटक आहे असे मात्र आपण मानत नाहीत. ती एका जाणीवे संबंधीची जाणीव आहे. त्याचप्रमाणे बाह्य वस्तूचे ज्ञान बाह्य वस्तू अस्तित्वात नसताना देखील होण्यास काय हरकत आहे? असा प्रश्न उपस्थित करून बाह्य पदार्थाचे अस्तित्व नाकारतात. बाह्य पदार्थ खरोखरच अस्तित्वात असते तर सर्वांना सारखेच भासले असते. किंवा त्याचे ज्ञानही सर्वांना सारखेच झाले असते. पण प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. एखाद्याला चंद्र आनंदी, अल्हाददायक वाटतो तर दुसऱ्याला तो दुःख देणारा वाटेल. असे का घडते. असा फरक का पडतो. याचे उत्तर आपल्या वासना किंवा भावना या भिन्न असतात. म्हणजेच थोडक्यात ज्ञान हे भावनांनी ठरत असते. बाह्य पदार्थामुळे नव्हे. बाह्य पदार्थामुळे ज्ञानाचा आकार निर्माण होत नसेल तर बाह्य पदार्थ मानण्याची गरजच काय आहे? असा प्रश्न उपस्थित करून बाह्य पदार्थाचे अस्तित्व नाकारून केवळ विज्ञान किंवा संकल्पना मान्य केलेल्या आहेत असे दिसून येते.

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

विज्ञानाचा अखंड ओघ चालू असतो त्या ओघाचे दोन तऱ्हेची विज्ञान असतात असे विज्ञानवादी मानतात. प्रत्येक विज्ञान क्षणजीवी आहे. ते ज्याच्यातून निर्माण होते आणि ज्याच्यात विलीन होते असा एक विज्ञान रुपी जलाशय आहे. त्याला 'आलय विज्ञान' असे म्हणतात. आलय विज्ञान म्हणजे विज्ञानाचा साठा, संग्रह, विश्रामस्थान. या विश्रामस्थानात निरनिराळी विज्ञाने बीजरूपाने राहतात. या आलय विज्ञानातून प्रत्यक्ष रूप धारण करून बाहेर पडणारे विज्ञान म्हणजे प्रवृत्ती विज्ञान होय. प्रवृत्ती विज्ञान यांच्या ओघाशिवाय किंवा यांच्या प्रवाहाशिवाय आलय विज्ञान नावाची कोणतीही वेगळी वस्तू नाही असे विज्ञानवादी मानतात. विज्ञानाचा ओघ चालू आहे अशी जाणीव म्हणजे विज्ञान होय. आणि त्यातील प्रवृत्ती विज्ञाना बरोबर 'मी आहे' अशी जाणीव असते. पण ती जाणीव अहम किंवा अहंकारी जाणीव नसते. प्रवृत्ती विज्ञानाच्या जाणिवेला अवलंबून असते. विषय असतो. त्यामुळे ते विषय रूपाने भासते. विज्ञानवादी प्रत्येक विज्ञान मान्य करीत असले तरीही अखंड, अविकारी, नित्य, आत्मतत्त्वास मान्यता देत नाहीत. ही गोष्ट मात्र लक्षात ठेवावी लागते. शून्यवादी चैतन्यतत्व मान्य करणारे असल्यामुळे चैतन्य तत्व मान्य करून 'मी' नाकारण्यासाठी त्यांनी हा सर्व खटाटोप केला आहे हे जाणवते. विज्ञानवाद्यांच्या मताचा आढावा घेतल्यास त्यांचे हे मत तांत्रिक स्वरूपाने बरोबर असले तरी व्यावहारिक पातळीवर आपल्याला मात्र समर्थनही करता येत नाही. आणि त्याचा योग्य अर्थही काढता येत नाही. विज्ञानाला संकल्पना असे म्हणत असले तरी ही विज्ञान म्हणजे नेमके काय? हे कुठेही स्पष्ट होत नाही. 'मी' हे नाकारण्यासाठी विज्ञान हा शब्द वापरला असला तरी 'मी' हे त्यातून प्रतीत होते असे आपल्याला जाणवते. माध्यमिक मत किंवा शून्यवाद संप्रदाय याने कशाचेच अस्तित्व मान्य केले नाही. विज्ञानाचे अस्तित्व देखील त्यांना मान्य नाही. व्यवहारांमध्ये ज्या कशाचे अस्तित्व 'हे आहे' असे आपण म्हणतो ते देखील नाकारले आहे. आपले सर्वच ज्ञान विरोध ग्रस्त आहे असे त्यांचे मत होते. सत्य म्हणजे टिकणारे असा अर्थ सांगून कुठलेच ज्ञान टिकणारे नाही. कोणतेच निश्चित विधान करता येत नाही. कशाबद्दलही काहीही विधान करता येत नाही. आपले सर्व ज्ञान अयथार्थ आहे. काहीच अस्तित्वात नाही. कशाचेही ज्ञान होऊ शकत नाही. असे मत माध्यमिक यांनी मांडले. माध्यमिक काहीच मान्य करत नाहीत म्हणून त्यांना शून्यवादी म्हणतात. माध्यमिकांनी आपल्या मताच्या सिद्धतेसाठी काही युक्तिवाद सांगितले आहेत.

पदार्थ अस्तित्वात आहेत असे मान्य केले तर त्यांचे निश्चित स्वरूप सांगता आले पाहिजे पण ते सांगता येत नाही. समोरचा खांब घ्या. खांब म्हणजे अनेक कणांचा समुदाय आहे. का तो त्याच्या पेक्षा वेगळा आहे. जर तो कणांचा समुदाय असेल तर त्याचे ज्ञान आपल्याला झाले पाहिजे. पण प्रत्यक्षात कणाचे ज्ञान होण्यापेक्षा खांबाचेच होते. 'खांब' आणि 'कण' अवयव आणि अवयवी हे भिन्न आहेत का एकच आहेत. कणा शिवाय खांब, अवयवा शिवाय अवयवी कसा उपस्थित असेल? ज्ञान कोणाचे किंवा अवयवाचे व्हावयास पाहिजे. पण तसे होत नाही. खांब किंवा अवयवी अस्तित्वात आहे असेही म्हणता येत नाही. त्यामुळे काहीच नाही असे म्हणणे योग्य ठरेल. बऱ्याच वेळेला आपले ज्ञान प्रमाद ग्रस्त असते. चुकांनी युक्त असते. आपल्यासमोर चकाकणारा पदार्थ 'रूपे' आहे किंवा 'रजत आहे. भ्रमज्ञानातील रूपे अस्तित्वात नसते. हे सर्व जण मान्य करतात. पण भ्रमज्ञानातील खोट्या ज्ञानाचा भाग बाजूला करून बाकीच्या ज्ञानाचा भाग कसे म्हणता येईल? हा प्रश्न माध्यमिकांनी उपस्थित केला. त्यांनी उदाहरण घेताना भ्रमज्ञानातील आरोपित वस्तू असत् असते. पण ज्याच्यावर आरोप केला जातो ते सत्असते असे कसे म्हणता येईल? हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. ज्ञानातील हा असत् आणि त्या विषयास सामावून घेणारे मात्र सत् असते असे म्हणणे योग्य नाही. प्रत्येक ज्ञान भ्रमाच्या ज्ञानासारखेच असते असे ते म्हणतात. थोडक्यात ज्ञानच नाही तर ज्ञाता कुठून येणार? ज्ञान नाही, ज्ञाता नाही यालाच ते शून्यवाद म्हणतात.व्यवहारिक उदाहरणांमध्ये एखाद्या पदार्थाची गरज असेल तर तो पदार्थ मिळविण्यासाठी आपण क्रियाशील बनतो. माठ (घट) हवा असेल तर माती, चाक इत्यादी साहित्य घेऊन आपण क्रियाशील बनतो. माध्यमिकांच्यामते घट हा जर आकाशाप्रमाणे सत् असेल तर त्याला क्रिया व्यापाराची गरज नाही. ज्या अर्थी त्याची गरज भासते त्या अर्थी तो सत् नाही. त्याच बरोबर 'त्याला असत् म्हणावे तर त्याचा उपयोग करता आला नसता. म्हणून तो सत् ही आहे असत् ही आहे. असे म्हटले तर व्याघात निर्माण होतो आणि तो सत् ही नाही आणि असत् ही नाही' असे म्हटले तर काहीही अर्थ प्राप्त होत नाही. ही चारही विधाने याला लागू पडत नाहीत. यालाच ते शून्यता असे म्हणतात.

T.C.
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

माध्यमिकांनी सर्व शून्य आहे असे म्हटले आहे. या शून्यचा नेमका अर्थ काय याचा विचार नागार्जुनांनी केलेला आहे. नागार्जुनांनी शून्याचे दोन अर्थ करता येतील असे सांगितले आहे. आपल्या नित्याच्या अनुभवातील सर्व पदार्थांना शून्य म्हणणे म्हणजे सर्व पदार्थ नि:स्वभाव आणि परतंत्र आहेत. ज्या कशाला सत् किंवा असत् मानावयाचे त्याला स्वत:चा स्वभाव असलाच पाहिजे. तो पदार्थ स्वाधिष्टित असला पाहिजे. जगातील प्रत्येक पदार्थ परतंत्र आहे. दुसरा तिसऱ्यावर अवलंबून असतो. हे सर्व प्रतित्यसमुत्पादामुळे प्रत्येक पदार्थ परतंत्र असतो. नि:स्वभाव असतो, हीच पदार्थाची शून्यता होय असे नागार्जुन म्हणतात. आपले सर्व ज्ञान उपाधी मुक्त केले तर ते सत्य होय. ते पारमार्थिक सत्य पारमार्थिक सत्याला सुद्धा माध्यमिकांनी शून्य हे नाव दिले आहे. शून्य म्हणजे उपाधिरहित अनुभव जे अनिर्देश, अनिर्वाच्य आहे असे आपण म्हणतो ते शून्य होय. शून्य म्हणजे काहीच नाही असे नव्हे. काहीच नसते तर अनुभव आला नसता. अनुभवाला ज्ञान न म्हणता माध्यमिक प्रज्ञा. प्रज्ञा निरूपाधिक असते. प्रज्ञा मध्ये ज्ञाता आणि ज्ञय यांचा लोप झालेला असतो. या अद्वेत अनुभवाला 'प्रज्ञा परिमित' असे नाव दिले आहे. हाच शून्याचा दुसरा अर्थ होय.व्दैत नाहीसे करून प्रज्ञा परिमिता हे पारमार्थिक सत्य आहे. याला सत्य म्हणण्यापेक्षा 'तथाता' असे असे म्हटले आहे. माध्यमिकांचा हा विचार शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञाना जवळ जाणारा आहे असे काही लोक म्हणतात. माध्यमिकांचा शून्य आणि शंकराचार्यांचा ब्रम्हा अनुभव हे दोन्ही पारमार्थिक सत्य आहेत असे आपल्याला म्हणता येईल.

**सारांश** :- सारांश रूपाने आपणास असे दिसून येते की बौद्ध दर्शनकारांनी आपला ज्ञान सिद्धांत सांगत असताना प्रत्यक्ष आणि अनुमान ही दोनच ज्ञानाची प्रमाणे मांनली आहेत. स्वीकारली आहेत. पण त्याच बरोबर त्यांनी भारतीय परंपरेतील इतरही प्रमाणांची चर्चा किंवा इतर प्रमाणं विषयी आपले मत सविस्तर व्यक्त केले आहे. त्यामुळे ते प्रत्यक्ष आणि अनुमान विषयी सविस्तर बोलतात तर इतर प्रमाणांची जसे शब्द, अनुपलब्धी, ख्यातिवाद, आत्मख्यातीवाद यासंबंधी ही चर्चा करताना दिसून येतात. दिग्नाग याच्या मतानुसार प्रत्यक्ष ही कल्पना रहित असते.औ त्यात वस्तूचे नाम, जाती इत्यादीची योजना नसते. त्यांच्या मते भ्रमर रहित ज्ञान म्हणजे 'जे व्यवहारात प्रत्यक्ष उपयोगात येत ते होय.'

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

**निष्कर्ष** :- बौद्धांच्या ज्ञानमीमांसेचा अभ्यास केल्यानंतर आपणांस पुढील निष्कर्षापर्यंत जाऊन पोहोचता येते.

बौध्दांचा ज्ञानसिद्धांत हा व्यवहारी आहे.

बौद्ध आपल्या ज्ञान सिद्धांताच्या माध्यमातून सर्वसामान्यांना परवडेल असा मार्ग (जीवन मार्ग) सांगतात की व्यक्तीने मध्यममार्गी असावे.

उपास-तापास, आत्मक्लेशाने मानवाला जीवनभर मोक्षप्राप्ती करता येत नाही.

बुद्धांचे तत्त्वज्ञान हे मध्यममार्गी आहे.

**संदर्भसूची** :-

भारतीय ज्ञानमीमांसा, नीलिमा सिन्हा, मोतीलाल बनारसीदास प्रकथन २००५.

तत्रैव.

भारतीय तत्वज्ञान. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, मैत्री प्रकाशन लातूर . पृष्ठ २०८

तत्रैव.

Assistant Professor
...ji College, Hing...
Dist. Hingoli



Scanned with OKEN Scanner